# जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी यांचे कार्यालय, रत्नागिरी

## उपचिटणीस शाखा

दूरध्वनी क्र. :-०२३५२-२२२३०१ फॅक्सक्र.०२३५२-२२६२५०

Email ID:- **homebranchrtn@yahoo.In**


क्र.उचिशा/पोल-2/ब्रेक द चेन/2021 दिनांक- 14/04/2021

**वाचले:** 1) भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम, 1897 व महाराष्ट्र कोव्हीड-19 उपाययोजना नियम, 2020

2) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, 2005

3) फौजदारी प्रक्रिया संहिता, 1973 चे कलम 144

4) महाराष्ट्र शासनाकडील आदेश No.DMU/2020/CR.92/DisM-1, दिनांक 04, 05 व 09 एप्रिल 2021

5) या कार्यालयाकडील क्र.उचिशा/पोल-2/ब्रेक द चेन/2021 व क्र.उचिशा/पोल-2/ब्रेक द चेन/पु.आ.1/2021 सम दिनांक 05/04/2021 व दिनांक 09/04/2021 चे आदेश / पुरवणी आदेश

6) महाराष्ट्र शासनाकडील आदेश No.DMU/2020/CR.92/DisM-1, दिनांक 13 एप्रिल 2021

---

**कोरोना विषाणू (कोव्हीड-19) संसर्ग साखळी तोडण्यासाठी प्रतिबंधात्मक**

**आदेश**

ज्याअर्थी, शासनाने कोरोना विषाणूचा (कोव्हिड-19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी महाराष्ट्र राज्यात साथ रोग प्रतिबंधक कायदा, 1897, दिनांक 13 मार्च, 2020 पासुन लागु करुन खंड 2,3,4 मधील तरतूदींनूसार अधिसूचना निर्गमीत केलेली आहे.

आणि ज्याअर्थी, जागतिक आरोग्य संघटनेने करोना विषाणू संक्रमण हा जागतिक साथीचा रोग (World Pandemic) घोषित केला असून, शासन, सार्वजनिक आरोग्य विभागाकडील उपरोक्त संदर्भ अ.क्र.5 चे अधिसूचनेद्वारे करोना विषाणूचा प्रसार रोखण्याकामी "महाराष्ट्र कोविड-19 उपाययोजना नियम 2020" प्रसिध्द केलेले आहेत.

आणि ज्याअर्थी, उपरोक्त वाचले क्र. 6 अन्वये शासनाने दिनांक 14 एप्रिल 2021 रात्री 08.00 ते दिनांक 01 मे 2021 रोजी सकाळी 07.00 वाजेपर्यंत या कालावधीकरीता आदेश निर्गमित केलेले आहेत सदर आदेशाची अंमलबजावणी रत्नागिरी जिल्हयात करणे आवश्यक असल्याने मी **मी संजय शिंदे, जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण रत्नागिरी** सोबतच्या परिशिष्ट अ मधील बाबींसह सदरचा आदेश निर्गमित करीत आहे.

उपरोक्त आदेशाचे पालन न करणाऱ्या कोणत्याही व्यक्ती अथवा संस्थेवर भारतीय साथरोग अधिनियम 1897 आणि आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005 मधील तरतुदीप्रमाणे कारवाई करण्यात येईल याची नोंद घेण्यात यावी.

**सदरचा आदेश संपुर्ण रत्नागिरी जिल्हयाच्या क्षेत्रासाठी (प्रतिबंधीत क्षेत्र वगळून) लागू राहील.**

Scanned with CamScanner

सदरच्या आदेशाची अंमलबजावणी आज दिनांक 14 एप्रिल 2021 रोजी रात्री 08.00 वाजलेपासून ते दिनांक 1 मे 2021 चे सकाळी 07.00 वाजेपर्यंत अंमलात राहील. सदरचा आदेश आज दिनांक 14/04/2021 रोजी माझ्या सही व शिक्कयानिशी निर्गमित करण्यात येत आहे.

जिल्हा दंडाधिकारी
सत्यमेव जयते
रत्नागिरी

(संजय शिंदे)
जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष,
जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,
रत्नागिरी

प्रत - माहितीसाठी तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी

1) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रत्नागिरी
2) पोलीस अधीक्षक, रत्नागिरी
3) जिल्हा शल्य चिकित्सक, रत्नागिरी
4) जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, रत्नागिरी
5) उपविभागीय दंडाधिकारी, (सर्व)
6) तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, (सर्व)
7) तहसीलदार सर्वसाधारण (जिल्हाधिकारी कार्यालय,रत्नागिरी) संकलन-13 यांजकडे पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी
8) जिल्हा माहिती अधिकारी, रत्नागिरी

Scanned with CamScanner

## ब्रेक द चेन - परिशिष्ठ - अ

## (दिनांक 14/04/2021 रोजीचा आदेश)

**1.कलम 144 आणि रात्र संचारबंदी लागू करणे.**

a) रत्नागिरी जिल्हयात फौजदारी प्रक्रीया संहिता 1973 चे कलम 144 लागू करणेत येत आहे.

b) कोणत्याही नागरीकास सार्वजनिक ठिकाणी खाली नमुद केल्याप्रमाणे वैध कारणाशिवाय सार्वजनिक ठिकाणी फिरता येणार नाही.

c) सर्व आस्थापना, दुकाने, सार्वजनिक ठिकाणे, सेवांना बंदी असेल.

d) अत्यावश्यक श्रेणीत मोडणा-या सेवा आणि व्यवहार हे यातुन वगळण्यात आलेले आहेत.

e) ज्या सेवांना अत्यावश्यक सेवेमध्ये नमूद केले आहेत अशांना सकाळी ७.०० ते रात्री ८.०० पर्यंत सेवा देण्यास परवानगी असेल.

f) वाहन चालक, घरकाम करणारे कर्मचारी यांना त्यांच्या कामाच्या ठिकाणी जाण्यासाठी सूट देण्यात येत आहे.

**2. अत्यावश्यक सेवेमध्ये पुढील गोष्टीचा समावेश असेल -**

1) रुग्णालये, रोग निदान केंद्रे, क्लिनिक्स, लसीकरण केंद्रे, वैद्यकीय विमा कार्यालये, औषध दुकाने, औषधे निर्मिती उद्योग इतर वैद्यकीय आणि आरोग्य सेवा यामध्ये सहाय्यभूत निर्मिती आणि वितरण युनीटस् सह विक्रेते, वाहतुकदार व पुरवठा साखळी याचा समावेश असेल. त्याशिवाय लस, सॅनिटायझर, मास्क, वैदयकीय उपकरणे, त्यास पुरक कच्चा माल निर्मिती उदयोग व सहाय्यभुत सेवा यांचाही समावेश असेल.

2) पशुवैदयकीय सेवा / पाळीव प्राणी काळजी केंद्र व त्यांची खादय दुकाने.

3) किराणा माल दुकाने, भाजीपाला दुकाने, फळ विक्रेते, दुध डेअरी, बेकरी, मिठाई खाद्य दुकाने, अन्य खादय दुकाने

4) शीतगृहे व गोदाम सेवा.

5) सार्वजनिक वाहतुक व्यवस्था - जसेकी, विमान सेवा, रेल्वे, टॅक्सी, ऑटो रिक्षा आणि सार्वजनिक बसेस.

6) विविध देशांच्या परराष्ट्र संबंध विषयक कार्यालयांच्या सेवा.

7) स्थानिक प्राधिकरणाकडून करण्यात येणाऱ्या सर्व मान्सून पूर्व उपक्रम, सेवा, व कार्ये.

8) स्थानिक प्राधिकरणाव्दारे पुरविणेत येणाऱ्या सर्व सार्वजनिक सेवा.

9) RBI ने ठरविलेल्या अत्यावश्यक सेवा

10) SEBI प्राधिकृत बाजार व कार्यालये, Stock Exchange, व त्यासंबंधित अन्य आस्थापना

11) दुरध्वनी संबंधित सेवा

12) मालाची / वस्तुंची वाहतुक.

13) पाणी पुरवठा सेवा.

14) कृषी विषयक सेवा सुरळीतपणे चालू ठेवणेसाठी आवश्यक शाखा यामध्ये शेतीच्या साधनांची उपलब्धता, बियाणे, खते, कृषी अवजारे व त्यांची दुरुस्ती यांचा समावेश राहील.

15) सर्व वस्तुंची आयात - निर्यात

16) ई कॉमर्स. (अत्यावश्यक माल आणि सेवा यांचा पुरवठा)

17) मान्यताप्राप्त प्रसारमाध्यमे आणि त्यांच्याशी संबंधित सेवा



Scanned with CamScanner

18) पेट्रोल पंप व पेट्रोलियम उत्पादने (जसे की समुद्रातील व किनाऱ्यावरील उत्पादने)
19) सर्व कार्गो सेवा
20) डेटा सेंटर / क्लाऊड सर्व्हीस /आय टी सेवा ज्या पायाभुत सुविधा आणि सेवा पुरवितात
21) सरकारी आणि खाजगी सुरक्षा सेवा
22) विदयुत आणि गॅस पुरवठा सेवा
23) एटीएम सेवा
24) टपाल सेवा
25) बंदरे आणि त्यासंबंधीच्या कृती
26) लस / जीवनरक्षक औषधे / औषधी उत्पादने यांचे संबंधी वाहतुक करणारे कस्टम हाऊस एजंट परवानाधारक मल्टी मोडल ऑपरेटर्स
27) कोणत्याही अत्यावश्यक सेवांसाठी कच्चा माल / पॅकेजींग साहित्य बनविणाऱ्या आस्थापना
28) आगामी पावसाळयासाठी वैयक्तिक वा संस्थात्मक उत्पादनांमध्ये कार्यरत कारखाने
29) स्थानिक आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाव्दारे निश्चित केलेल्या अत्यावश्यक सेवा.
30) वन विभागाने जाहीर केलेली वनासंबंधीची आवश्यक कामे.
31) हवाई वाहतुक व त्यासंबंधिच्या सेवा (एअरलाईन, एअरपोर्ट, डागडूजी, इंधन पुरवठा, सुरक्षा व्यवस्था इत्यादी)

1. सर्व अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणांनी हे सर्व निर्बंध नागरिकांच्या वावरावर / हालचालींवर असून वस्तू आणि मालावर नाहीत, हे लक्षात घ्यावे.
2. यात नमूद केलेल्या सेवांच्या कार्यान्वयनासाठी आवश्यक वाहतूक हे वैध कारण राहील, हे लक्षात घ्यावे.
3. अत्यावश्यक सेवांचा वापर तडीस नेणेसाठी अनुषंगिक वैयक्तिक किंवा संस्थात्मक कृतींना अत्यावश्यक गणले जाईल. **"अत्यावश्यक साठी जे अत्यावश्यक आहे ते अत्यावश्यक"** हे तत्व लागू राहील.

**3. अत्यावश्यक सेवा म्हणून गणली गेलेली दुकाने या आदेशातील खालील मार्गदर्शक सूचनांचे पालन करतील.**

**a.** जिवनावश्यक वस्तुंच्या पुरवठादार / दुकानदार / आस्थापना चालकांनी, कामगार आणि ग्राहक यांनी त्यांची सेवा कार्यरत ठेवताना कोव्हीड-19 च्या अनुषंगाने देण्यात आलेल्या सर्व सूचनांचे पालन करावे.

**b.** भारत सरकारकडून देणेत आलेल्या मार्गदर्शक सूचनांनूसार आवश्यक सेवा पुरविणारे दुकान मालक, त्यामध्ये काम करणारा कामगार वर्ग यांचे लवकारत लवकर लसीकरण करून घेणेत यावे. सर्व अत्यावश्यक सेवांच्या दुकानामध्ये ग्राहकांशी संवाद साधताना सुरक्षा उपायांचे जसे की, पारदर्शक काचेमधून संपर्क अथवा इतर सुरक्षा उपाय, ऑनलाईन पेंमेंट इत्यादीचे पालन करणेत यावे.

**c.** वरील नियमांचा भंग करणाऱ्या दुकानमालक, कर्मचारी किंवा ग्राहकाला पाचशे रुपये दंड केला जाईल. तसेच कोविड सुसंगत वागणूकीचा भंग करणाऱ्या ग्राहकाला माल दिला जात असेल तर दुकानाला एक हजार रुपये दंड केला जाईल. तसेच शर्तभंगाची पुनरावृत्ती झाल्यास कोरोना साथ संपेपर्यंत दुकान बंद करण्याची कार्यवाही केली जाईल.

**d.** जिवनावश्यक दुकाने/आस्थापना/सेवा यांनी दुकानातले व्यवहार करण्यासाठी कामगारांची केलेली वाहतूक हे वैध कारण मानले जाईल.



Scanned with CamScanner

e. जिवनावश्यक सेवेत येणारे किराणा दुकाने, भाजीपाला दुकाने व फळविक्रेते इत्यादी या सर्वांच्या बाबतीत एकाच ठिकाणी गर्दी होणार नाही याचे नियोजन स्थानिक प्रशासनाने करावे जेणेकरून कोरोणाचा प्रसार होणार नाही याची दक्षता घ्यावी.

f. या आदेशाने बंद करणेत आलेल्या सर्व प्रकारच्या दुकानामध्ये काम करणाऱ्या सर्व कामगारांचे भारत सरकारकडून देणेत आलेल्या मार्गदर्शक सूचनांनूसार लवकरात लवकर लसीकरण करून घेणेत यावे. तसेच दुकान मालकांने दुकानामध्ये ग्राहकांशी संवाद साधणेसाठी सुरक्षा उपायांचे जसेकी, पारदर्शक काचेमधून संपर्क अथवा इतर सुरक्षा उपाय, ऑनलाईन पैमेंट इत्यादी याची पुर्वतयारी करणेत यावी, जेणेकरून शासनाकडून कोव्हीड -19 विषाणू संसर्गाचा प्रसार होईल याची भिती न बाळगता, बंद असलेली दुकाने पुन्हा सुरू करणेबाबत तात्काळ निर्णय घेणे सोईस्कर होईल.

**4. सार्वजनिक वाहतुक व्यवस्था - सार्वजनिक वाहतुक व्यवस्था खालील निर्बधांचे पालन करत, पूर्ण क्षमतेने सुरू राहील.**

| | |
|---|---|
| ऑटो रिक्शा | चालक + फक्त 2 प्रवासी |
| टॅक्सी ( चारचाकी वाहन) | चालक + वाहनाच्या प्रवासी क्षमतेच्या 50 % (आरटीओ विभागाकडील नियमानूसार ) |
| बस | आरटीओ विभागाकडील नियमानूसार सर्व बसण्याच्या जागा असतील इतके प्रवासी .<br>कोणत्याही परिस्थितीत उभा राहून प्रवास करणेस प्रवाशांना परवानगी असणार नाही. |

a. सार्वजनिक वाहतुक व्यवस्थेचा वापर करणाऱ्या सर्व नागरिकांनी योग्य पध्दतीने मास्कचा वापर करणे बंधनकारक असेल. याचे उल्लघंन करणारी व्यक्ती रक्कम रुपये 500/- दंडास पात्र राहील.

b. चारचाकी वाहनामध्ये / टॅक्सी मध्ये जर एखाद्या प्रवाशाने मास्क वापरला नसेल, अशावेळी संबंधित उल्लंघन करणारा प्रवासी आणि चालक हे प्रत्येकी रक्कम रूपये 500/- दंडास पात्र राहतील.

c. प्रत्येक वेळी प्रवास पुर्ण करून आलेल्या वाहनांचे निर्जतुकीकरण करणे आवश्यक राहील.

d. सर्व सार्वजनिक वाहतूक- केंद्र शासनाच्या निकषानुसार जनतेच्या संपर्कात येणारे वाहन चालक आणि इतर कर्मचारी यांनी लवकरात लवकर लसीकरण करावे. तसेच टॅक्सी आणि ऑटोसाठी, ड्रायव्हर प्लास्टिकच्या शीटद्वारे स्वत: ला अलग ठेवावे.

e. सार्वजनिक वाहतुकीसाठी कर्तव्यावर जाणाऱ्या कर्मचारी यांना ये- जा करण्यासाठी प्रवास करणे हे वैध कारण मानले जाईल.

f. रेल्वेने प्रवास करणारे प्रवासी उभे राहुन प्रवास करणार नाहीत याची रेल्वे प्रशासनाने खबरदारी घ्यावी. तसेच सर्व प्रवाशी मास्कचा वापर करतील याची रेल्वे अधिकारी यांनी दखल घ्यावी.

g. सर्व गाड्यांमध्ये मास्क न वापरणाऱ्या व कोविड सुसंगत वागणूक न करणाऱ्या प्रवासी/चालक/ कर्मचारी यांना 500/- रुपये दंड आकारला जाईल.

h. सार्वजनिक वाहतुक म्हणून परवानगी देण्यात आलेल्या सेवा सुरळीतपणे सुरु राहण्यासाठी आवश्यक असणाऱ्या अनुषंगिक सेवा या अत्यावश्यक सेवा संबोधण्यात येत आहेत.



Scanned with CamScanner

i. रेल्वे, बसेस, विमान सेवा यामधून येणारे अथवा जाणारे प्रवासी यांनी सोबत अधिकृत तिकीट बाळगले असल्यास त्यांना घरापासून स्थानकापर्यंत / स्थानकापासून घरापर्यंत पब्लिक ट्रान्सपोर्ट मधून जाण्यास परवानगी राहील.

**5. सुट असलेल्या बाबी -**

**a) कार्यालये -**

* **खालील नमुद कार्यालये / आस्थापना सुट दिलेल्या बार्बीमध्ये मोडत आहेत.**

i. केंद्र, राज्य, स्थानिक स्वराज्य संस्था यांची कार्यालये व आस्थापना

ii. सहकारी, को-ऑपरेटीव्ह, सार्वजनिक क्षेत्रातील बँका, खाजगी बँका

iii. अत्यावश्यक सेवा पुरवठा करणाऱ्या कंपन्याची कार्यालये

iv. विमा / मेडीक्लेम कंपनी

v. औषध उत्पादन करणाऱ्या आस्थापना व त्यासाठी लागणारे साधन सामग्री उत्पादक तसेच त्याच्याशी संबंधित कार्यालये

vi. RBI ने नियमित केलेल्या संस्था आणि मध्यस्थांसह प्राथमिक विक्रेते CCIL, NPCL पेमेंट सिस्टीम ऑपरेटर, RBI ने नियमन केलेल्या बाजारातील वितीय बाजाराच्या सहभागासह

vii. सर्व बिगर बँक वितीय संस्था,

viii. सर्व सुक्ष्म वित्त संस्था

ix. अभियोक्तांची (वकील) कार्यालये, जसे की कोर्टाचे कामकाज, न्यायाधीकरण किंवा चौकशी आयोग यांची कार्यालये.

1. वरील सर्व कार्यालये कमीत कमी 50% उपस्थितीत सुरु राहतील. मात्र कोव्हीड-19 संबंधित कामकाज करणाऱ्या आस्थापना पुर्ण क्षमतेने सुरु ठेवणेबाबत निर्णय संबंधित आस्थापना प्रमुख घेतील.
2. वरील नमुद सेवेतील कर्मचाऱ्यांना कामावर येण्याजाण्याचा प्रवास हा वैध कारणासाठी आहे असे समजले जाईल.
3. सर्व शासकीय कार्यालयात तसेच शासकीय कंपनी कार्यालयात अभ्यांगताना कार्यालयात येणास प्रतिबंध राहील.
4. संबंधित आस्थापना यांनी कार्यालय उपस्थिती अधिकारी / कर्मचारी यांचे व्यतिरिक्त घेण्यात येणाऱ्या सर्व सभा / मिटींग ऑनलाईन पध्दतीने आयोजित कराव्यात.
5. सर्व शासकीय व खाजगी कार्यालय प्रमुखांनी कार्यालयातील अधिकारी / कर्मचारी यांचे लसीकरण, केंद्र सरकार व्दारे निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनानुसार लवकरात लवकर करुन घेणे अनिवार्य आहे. जेणेकरुन कोरोना विषाणूचा प्रसार कमी होऊन कार्यालय पुर्ववत सुरु करता येतील.

**b) खाजगी वाहतुक व्यवस्था -**

1. सर्व प्रकारची खाजगी वाहने, खाजगी बसेस या केवळ या आदेशान्वये अत्यावश्यक सेवेसाठीच सुरु राहतील
2. नियमांचे उल्लंघन झाल्यास रु.1000/- दंड आकारण्यात येईल.



Scanned with CamScanner

3. खाजगी बसेस यांनी खालील निर्देशांचे पालन करणे बंधनकारक राहील.

i. खाजगी बसेस वाहनाच्या आसन क्षमतेनुसार सुरु राहतील. प्रवासी उभे राहून प्रवास करण्यास प्रतिबंध राहील.

ii. सर्व खाजगी वाहतुक करणारे चालक / मालक व कर्मचारी यांनी केंद्रसरकारव्दारे निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनानुसार लवकरात लवकर लसीकरण करुन घ्यावे. ज्यांचे लसीकरण झाले नसेल त्या चालक / मालक व कर्मचारी यांनी कोरोनाचे -Ve RTPCR Test / RAT /TruNAT / CBNAAT प्रमाणपत्र जवळ बाळगणे आवश्यक राहील.

**c) रेस्टॉरंट, बार आणि हॉटेल विषयक -**

a. हॉटेलमध्ये रहिवासी असणारे व हॉटेलचा अविभाज्य भाग असणाऱ्या व्यक्ती व्यतिरीक्त अन्य लोकांसाठी सर्व रेस्टॉरंट, बार बंद राहतील

b. रेस्टॉरंट, हॉटेल्स, बारव्दारे केवळ घरपोच सेवा सुरु राहील. हॉटेलमध्ये जाऊन पार्सल आणण्याची सुविधा असणार नाही.

c. हॉटेलमध्ये रहिवासाकरीता उतरलेल्या पाहुण्यांसाठी फक्त हॉटेलमधील रेस्टॉरंट आणि बार सुरू राहतील. कोणत्याही परिस्थितीत बाहेरील पाहुण्यांसाठी, या सेवेचा लाभ देता येणार नाही. बाहेरील व्यक्तींसाठी वर नमूद केलेले रेस्टॉरंट आणि बारसाठीचे निर्बंध पाळणे बंधनकारक राहील. हॉटेल मधील पाहुणे फक्त वैध कारणासाठीच बाहेर पडू शकतात किंवा आवश्यक सेवांसाठी आवश्यक कर्तव्याच्या कामगिरीसाठी किंवा या आदेशाने सुट दिलेल्या कामाकरीता बाहेर पडू शकतील.

d. भारत सरकारकडील निर्देशानूसार घरपोच सेवेशी संबंधित कामगार वर्गाचे लवकरात लवकर लसीकरण पुर्ण करावे.

e. घरपोच सेवा देणाऱ्या कर्मचाऱ्यांनी बिल्डींगमध्ये एका पेक्षा जास्त कुटुंबांना पार्सल दयावयाचे असल्यास सोसायटी / बिल्डींगच्या गेटवर सोसायटी / बिल्डींगच्या कर्मचाऱ्यांमार्फत देण्यात यावे. तसेच त्यांनी कोव्हीड संदर्भात मार्गदर्शक सूचनांचे पालन करावे.

f. सदर नियमांचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तींवर प्रत्येकी रक्कम रु. 1000/- व संबंधित आस्थापनांवर रक्कम रु.10,000/- याप्रमाणे दंडात्मक कारवाई करण्यात येईल. वारंवार नियमांचा भंग झाल्यास सदर आस्थापनांचा परवाना रद्द करणे अथवा केंद्र शासन कोव्हीड-19 आपत्ती संपुर्णपणे संपुष्टात आली असे घोषित करेल त्या दिवसापर्यंत संबंधित आस्थापना बंद करण्यात येईल.

g. भारत सरकार कडील निर्देशानुसार रेस्टॉरंट, बार, आस्थापनांमध्ये काम करणारे व्यक्ती / कामगार वर्ग या सर्वांचे लवकरात लवकर लसीकरण करण्यात यावे जेणेकरुन रेस्टॉरंट व बार लवकरात लवकर सुरु करणे सोईचे होईल.

**d) माल / वस्तु निर्माण क्षेत्र (Manufacturing Sector) -**

a. खालील उदयोग विविध पाळयांमध्ये सुरु ठेवता येतील.

i. अत्यावश्यक सेवेसाठी लागणारा माल तयार करणारे कारखाने आपल्या पूर्ण क्षमतेनुसार चालू राहतील.



Scanned with CamScanner

ii. निर्यात करण्यासाठीचे सामान बनविणारे कारखाने ज्यांना माल बाहेर पाठवायचा आहे.

iii. ज्या कारखान्यांमध्ये एकदम काम थांबवता येत नाही आणि जास्त वेळ लावल्याशिवाय उत्पादन पुन्हा सुरू होऊ शकणार नाही अशा सर्व कारखान्यांना 50 टक्के क्षमते सह काम करता येईल. महाराष्ट्र शासनाच्या उद्योग विभागाने याबाबत सर्व नियम काटेकोरपणे पाळले जात आहेत याची खात्री करावी. तथापि, अत्यावश्यक सेवा वगळून अन्य उदयोग जर निव्वळ ऑक्सिजनचे ग्राहक असतील तर त्यांना असे उदयोग सुरु ठेवता येणार नाही. सर्व उदयोगांना त्यांचे कर्मचारी हे उदयोग / कारखान्याच्या ठिकाणीच राहणेस ठेवणे आवश्यक राहील, तथापि, त्यांना अन्य ठिकाणी ठेवले असल्यास त्यांची ने-आण सुरक्षित पध्दतीने वाहतुकीव्दारे करावी जेणेकरुन कोव्हीड-19 चा प्रादुर्भाव वाढणार नाही.

b. कामगारांना राहण्याची व्यवस्था उद्योग किंवा युनिट मध्ये करण्यात यावी. तसेच कामगार त्याच परिसरातील किंवा इतर ठिकाणच्या कारखान्यात काम करत असतील आणि तेथून वाहतूक सोयीस्कर आणि सुरक्षित असेल तर ये जा करता येईल. त्याचप्रमाणे व्यवस्थापन मधील दहा टक्के कर्मचारी अधिकाऱ्यांना बाहेरून येऊन काम करता येईल, बाहेरुन येणाऱ्या कर्मचारी यांना एकाच वेळी परवानगी देण्यात येवू नये त्याऐवजी वेगवेगळया पाळयामध्ये परवानगी देण्यात यावी.

c. सर्व कर्मचारी - व्यवस्थापन व त्याचप्रमाणे प्रत्यक्ष काम करणारे कर्मचारी यांनी भारत सरकारच्या निर्देशानुसार लसीकरण तात्काळ करुन घेणे आवश्यक राहील.

d. कारखाने, आणि उत्पादक आस्थापना खालील अटी शर्तीस अधीन राहून सुरु ठेवता येतील.

i. कामगारांचे शारीरीक तापमान तपासूनच प्रवेश देण्यात यावा आणि सर्व संबंधितांनी कोव्हीडच्या अनुषंगाने निर्बंधांचे पालन केले असल्याची खात्री करावी.

ii. जर एखादा कर्मचारी कोरोना बाधीत आढळला तर त्याच्या सोबत निकट संपर्कात आलेल्या इतर कर्मचारी / मजूर यांना पगारी रजा देवून त्यांचे अलगीकरण करण्यात यावे.

iii. ज्या कारखान्यात / आस्थापनेत 500 पेक्षा जास्त कर्मचारी काम करत असतील अशा कारखान्यांनी / आस्थापनांनी त्यांचे स्वत:चे अलगीकरण केंद्र स्थापन करावे. सदर अलगीकरण केंद्रात प्राथमिक सुविधा असणे आवश्यक आहे आणि जर का सदरील सुविधा ही उदयोग परिसराच्या बाहेर असेल तर सुविधा असलेल्या अशा ठिकाणी प्रभावित व्यक्तीला स्थलांतरीत करताना तो अन्य कोणाच्या संपर्कात येणार नाही याची काळजी घ्यावी.

iv. जर एखादा कामगार कोरोना विषाणू बाधीत आढळल्यास, सदर आस्थापनेचे संपुर्ण निर्जंतुकीकरण होत नाही तोपर्यंत सदर आस्थापना बंद ठेवण्यात यावी.

v. जेवण व चहाच्या वेळा वेगवेगळया ठेवण्यात याव्यात जेणेकरुन गर्दी होणार नाही तसेच एकत्र बसून जेवण करणेस मनाई करावी.

vi. सार्वजनिक शौचालयांचे वेळोवेळी निर्जंतुकीकरण करणे आवश्यक राहील.



Scanned with CamScanner

e. जर एखादा कामगार तो किंवा ती कोरोना विषाणू बाधीत झाल्यास त्याला किंवा तिला वैदयकिय रजा देण्यात यावी व त्याला किंवा तिला कामावर गैरहजर राहीला या कारणास्तव कामावरुन कमी करता येणार नाही. सदर कामगारास पुर्ण पगारी वेतन देण्यात यावे.

f. या ठिकाणी नमूद नाही केलेले सगळे उद्योग / कारखाने यांनी आपला उद्योग सदर आदेशामध्ये उल्लेखित कालावधीपर्यंत बंद ठेवावा. काही शंका असल्यास उद्योग विभाग आणि प्रशासन या बद्दल अंतिम निर्णय घेईल.

**e. रस्त्याच्या कडेवरील खादयपदार्थ विक्रेते -**

1. रस्त्याच्या कडेला खादयपदार्थ विक्रेत्यांना जागेवर खादयपदार्थ खाण्यास पुरविता येणार नाहीत. फक्त पार्सल सेवा व घरपोच सेवा सकाळी 07.00 ते रात्री 08.00 या वेळेत सर्व दिवशी सुरु ठेवता येतील. पार्सल सेवा / घरपोच सेवा या कारणास्तव वाजवी हालचालीस परवानगी राहील.
2. प्रतिक्षाधीन ग्राहकांना काऊंटर पासून दूर सामाजिक अंतर राखून उभे राहणे बंधनकारक राहील.
3. ज्या व्यक्ती अशाप्रकारच्या कार्यात सहभागी असतील त्यांनी भारत सरकारच्या निर्देशानुसार लसीकरण तात्काळ करुन घेण्यात यावे.
4. स्थानिक प्रशासनाने सदर विक्रेत्यांवर प्रत्यक्ष किंवा सीसीटिव्ही व्दारे लक्ष ठेवावे. जे विक्रेते आणि ग्राहक सदर कोव्हीड - 19 उपाययोजनांचे उल्लंघन करतील ते 500 रु. दंडास पात्र राहतील. एखादया विक्रेत्याने ग्राहकास सेवा देताना कोव्हीड विषयक नियमांचे उल्लंघन केल्यास तो रु.500/- दंडास पात्र राहील.
5. वारंवार शर्तभंग आढळल्यास अशी आस्थापना कोव्हीड-19 चा प्रादुर्भाव संपेपर्यंत बंद ठेवणेत येईल.
6. तथापि, स्थानिक प्राधिकरणास असे निदर्शनास येईल की दंडात्मक कारवाई करुन सुध्दा संबंधितांच्या वर्तणूकीमध्ये सुधारणा होत नाही व दंडात्मक कार्यवाही करुन कोव्हीड-19 चा प्रादुर्भाव आटोक्यात येणे शक्य नाही, अशा वेळी अशी आस्थापना तात्पुरत्या किंवा कायमस्वरुपी बंद ठेवणेचे आदेशीत केले जाईल.

**f. वृत्तपत्रे, मॅगझीन (मासिके) पिरॉडिकल्स (साप्ताहिक, पाक्षिक, नियतकालिके) -**

1. वृत्तपत्रे, मॅगझीन (मासिके) पिरॉडिकल्स (साप्ताहिक, पाक्षिक, नियतकालिके) यांची छपाई आणि वितरणास परवानगी राहील.
2. केवळ घरपोच सेवेसाठीच परवानगी राहील.
3. भारत सरकार कडील निर्देशानुसार या व्यवसायाशी निगडीत सर्व व्यक्तींचे लवकरात लवकर लसीकरण करावे.

**6. मनोरंजन / करमणूक, दुकाने, मॉल्स, खरेदी केंद्रे, यावरील निर्बंध -**

a. सिनेमागृह बंद राहतील
b. नाटयगृहे प्रेक्षकगृहे बंद राहतील.
c. मनोरंजन पार्क, आर्केडस्, व्हीडीओ गेम्स पार्लर्स बंद राहतील.
d. वॉटर पार्क बंद राहतील.
e. क्लब, जलतरण तलाव, व्यायामशाळा आणि क्रिडा संकुले बंद राहतील.



Scanned with CamScanner

f. केंद्र सरकारच्या निर्देशानुसार वरील आस्थापनांशी निगडीत व्यक्ती / कामगार वर्ग या सर्वांचे लवकरात लवकर लसीकरण पुर्ण करावे. जेणेकरुन कोव्हीड - 19 विषाणू संसर्गाची भिती न बाळगता शासनास कार्यालये सुरु करणेबाबत निर्णय घेणे सोईस्कर होईल.
g. चित्रपट / मालिका / जाहिराती यांचे चित्रिकरणास परवानगी नसेल.
h. अत्यावश्यक सेवेशी संबंधित सेवा न पुरवणारी सर्व दुकाने, मॉल, शॉपिंग सेंटर्स, संपुर्णत: बंद राहतील.
i. सर्व सार्वजनिक ठिकाणे, उदयाने, मोकळया जागा, मैदाने इत्यादी संपूर्णत: बंद राहतील.

**7. धार्मिक / प्रार्थना स्थळे -**

a. सर्व धर्मिय धार्मिक / प्रार्थना स्थळे बंद राहतील.
b. सर्व धार्मिक आणि प्रार्थना स्थळांमध्ये धार्मिक सेवा करणारे सेवेकरी यांना त्यांच्या पारंपारीक आणि धार्मिक सेवा करता येतील. परंतु कोणत्याही बाहेरील भाविकास प्रवेश असणार नाही.
c. भारत सरकार कडील निर्देशानुसार धार्मिक आणि प्रार्थना स्थळामध्ये सेवा देणारे सेवेकरी यांचे लवकरात लवकर लसीकरण करावे. जेणेकरुन धार्मिक / प्रार्थना स्थळे पुर्ववत सुरु करण्याबाबत निर्णय घेणे सोयीस्कर होईल.

**8. केशकर्तनालय दुकाने / स्पा / सलून / ब्युटी पार्लर -**

a. सर्व केशकर्तनालय दुकाने / स्पा / सलून / ब्युटी पार्लर बंद राहतील.
b. भारत सरकारकडील निर्देशानूसार सर्व केशकर्तनालय दुकाने / स्पा / सलून / ब्युटी पार्लर मधील कामगार वर्ग यांचे लवकरात लवकर लसीकरण पुर्ण करावे, जेणेकरून केशकर्तनालय दुकाने / स्पा / सलून / ब्युटी पार्लर पुर्ववत सुरू करणेबाबत निर्णय घेणे सोईस्कर होईल.

**9. शाळां आणि महाविद्यालये -**

a. सर्व शाळा आणि महाविद्यालये बंद राहतील.
b. वरील नियमामधून 10 वी आणि 12 वी च्या विद्यार्थ्यांना परीक्षा पुरती सुट असेल. परिक्षा पार पाडण्यासाठी नियुक्त सर्व कर्मचारी यांनी लसीकरण करून घेणे किंवा 48 तासापर्यंत वैध असलेले कोरोनाचे -Ve **RTPCR Test / RAT /TruNAT / CBNAAT** प्रमाणपत्र जवळ बाळगणे आवश्यक राहील.
c. महाराष्ट्र राज्याबाहेरील कोणत्याही परिक्षा मंडळ, विद्यापीठ अथवा प्राधिकरणाने परीक्षेसाठीचे आयोजन केले असल्यास महाराष्ट्रातील रहिवासी असणाऱ्या विदयार्थ्यांना प्रवेश प्रक्रियेत सहभागी होण्यास त्रास होऊ नये म्हणून संबंधित विभागाने संबंधित आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणास माहिती देवून अशा विदयार्थ्यांना परीक्षेस प्रवेश देण्यात यावा.
d. ज्या विदयार्थ्यांना परीक्षा देणेसाठी प्रत्यक्ष उपस्थित राहणे आवश्यक आहे त्यांना वैध परीक्षा प्रवेशपत्राच्या आधारे एका प्रौढ व्यक्तीसोबत प्रवास करण्याची परवानगी राहील.
e. सर्व प्रकारचे खाजगी शिकवणी वर्ग बंद राहतील.
f. भारत सरकारकडील निर्देशानूसार वरील नमूद आस्थापनामधील कार्यरत कर्मचारी वर्ग यांचे लवकरात लवकर लसीकरण पुर्ण करावे, जेणेकरून सदरील आस्थापना पुर्ववत सुरू करणेबाबत निर्णय घेणे सोयीस्कर होईल.

Scanned with CamScanner

10. **धार्मिक, सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक कार्यक्रम -**

A. कोणत्याही प्रकारचे धार्मिक, सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक कार्यक्रम यांना परवानगी असणार नाही.

B. जिल्ह्यामध्ये कोणत्याही प्रकारच्या निवडणूका होऊ घातल्यास राजकीय प्रचारासाठी खालील अटी व शर्तींना अधीन राहुन जिल्हाधिकारी यांची परवानगी घेणे आवश्यक राहील.

a) निवडणूक प्रचारासाठी परवानगी देणेसाठी भारत निवडणूक आयोगाकडील निर्देश विचारात घेऊन जिल्हाधिकारी संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी यांना प्राधिकृत करतील. यामध्ये सभेच्या ठिकाणाची बैठक क्षमतेच्या 50% किंवा 200 व्यक्तींच्या मर्यादेत यापैकी जे कमी असेल एवढया व्यक्तींना एकत्रित येण्याची परवानगी असेल. यासाठी कोव्हीड-19 संबंधित सर्व शिष्टाचारांचे पालन करणे बंधनकारक राहील.

b) सदर ठिकाणी प्रचार सभेस दिलेल्या परवानगीचे उल्लंघन झालेस संबंधित सभा ठिकाणचा जागा मालक यांचेविरुध्द आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005 खाली दंडात्मक कार्यवाही केली जाईल. गंभीर उल्लंघनाचे बाबतीत संबंधित जागा, कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव पुर्णत: संपेपर्यंत सीलबंद करण्यात येईल.

c) राजकीय पक्षाच्या एकाच उमेदवाराचे बाबतीत 2 पेक्षा जास्त वेळा दिलेल्या परवान्यामधील अटी शर्तीचे उल्लंघन झाल्यास त्यांना पुढील कोणत्याही सभेची परवानगी देण्यात येणार नाही.

d) कोणत्या प्रकारचे मिरवणूका, कोपरा सभा या ठिकाणी कोव्हीड -19 प्रतिबंधात्मक उपाययोजनांचे पालन करणे बंधनकारक असेल.

e) वरील सर्व मार्गदर्शक सूचना या निवडणूक प्रक्रियेमध्ये असलेल्या सर्वांसाठी समान राहतील.

f) मतदानाच्या दिवशी रात्री 8.00 नंतर सदर आदेशातील सर्व तरतुदी पूर्णपणे सदर क्षेत्रात लागू होतील.

C. **लग्नसमारंभास जास्तीत जास्त 25 लोकांच्या उपस्थितीत परवानगी राहील.**

a. मंगल / लग्न कार्यालयाच्या ठिकाणी कार्यरत कर्मचारी तसेच त्याठिकाणी सेवा पुरविणारे अन्य व्यक्ती यांचे लसीकरण करुन घेणे आवश्यक राहील. लसीकरण होण्याच्या कालावधीपर्यंत संबंधितांनी कोरोनाचे -Ve RTPCR Test / RAT /TruNAT / CBNAAT प्रमाणपत्र जवळ बाळगणे आवश्यक राहील.

b. कोरोना - Ve RTPCR Test / RAT /TruNAT / CBNAAT प्रमाणपत्र व लसीकरण केलेले नाही असा सेवा देणारा व्यक्ती निर्देशर्नास आल्यास त्यास रक्कम रूपये 1000/- दंड आकारला जाईल आणि संबंधित आस्थापना मालकास रक्कम रूपये 10,000/- दंड आकारला जाईल.

c. लग्नसमारंभ आयोजित केले जात असलेल्या हॉलच्या परिसरामध्ये पुन्हा पुन्हा उल्लघंन झालेस सदर परिसर हा सिल केला जाईल, तसेच सदर ठिकाणी व्यवसाय करण्यास कोव्हीड -19 अधिसचूना अस्तित्वात असेपर्यंत परवानगी दिली जाणार नाही.

d. एखादा विवाह समारंभ धार्मिक प्रार्थना स्थळी आयोजित केल्यास उपरोक्त नियमांचे पालन करण्याचे अधीन राहून परवानगी राहील.

e. रत्नागिरी जिल्ह्यातील प्रतिबंधीत क्षेत्रामध्ये कोणतेही कार्यक्रम आयोजित करण्यास मनाई आहे. तथापि, प्रतिबंधीत क्षेत्र वगळूण इतर क्षेत्रात 25 लोकांच्या मर्यादेत लग्नसमारंभाचे आयोजन करणेकामी संबंधित उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी यांची परवानगी घेणे बंधनकारक राहील.



Scanned with CamScanner

D. अंत्ययात्रेसाठी जास्तीत जास्त 20 लोकांना परवानगी असेल. सदर अंत्यविधीचे ठिकाणी असणाऱ्या कर्मचारी वर्गाचे लवकरात लवकर लसीकरण करावे. सदर कर्मचाऱ्यांस वैध कोरोना - Ve RTPCR Test / RAT /TruNAT / CBNAAT प्रमाणपत्र जवळ बाळगणे आवश्यक राहील. धार्मिक प्रार्थना स्थळी अंत्यसंस्कार असल्यास उपरोक्त नियमांचे पालन करण्याचे अधीन राहून परवानगी राहील.

11. **ऑक्सिजन / प्राणवायू उत्पादक -**

a. प्राणवायूचा कच्चा माल म्हणून वापर करणाऱ्या कोणत्याही औद्योगिक प्रक्रियेस परवानगी असणार नाही. तथापि अत्यावश्यक उपक्रमातील प्रक्रियेसाठी किंवा अपवादात्मक परिस्थितीत आवश्यक कारणांची नोंद करून संबंधित यंत्रणेची परवानगी घेणे आवश्यक राहील.

b. सार्वजनिक आरोग्य विभागाने विहित केल्यानुसार सर्व औद्योगिक प्राणवायू उत्पादकांना त्यांच्या उत्पादन ( क्षमतेच्या तसेच प्रत्यक्ष ) टक्केवारीचा हिस्सा वैद्यकीय अथवा औषध निर्माणशास्त्र प्रयोजनार्थ राखून ठेवावा लागेल. दिनांक १० एप्रिल २०२१ पासून त्यांनी त्यांच्या ग्राहकांना पुरवठा केलेल्या प्राणवायूचे व त्यांच्या अंतिमतः उपयोगाबाबत घोषणापत्र जारी करावे लागेल.

12. **ई-कॉमर्स (ऑनलाईन व्यापार)-**

a. या आदेशात नमूद अत्यावश्यक सेवेतील वस्तू आणि सेवा वितरण करण्याची परवानगी आहे.

b. घरपोच वितरण/ सेवा देण्याऱ्या कर्मचारी व अशा व्यक्तींच्या संपर्कात येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीने सरकारी निकषानुसार तात्काळ लस घ्यावी.

c. एकापेक्षा अधिक कुटुंबे असलेल्या सदनिकेत वितरण करायचे असेल तर ते सदनिकेच्या प्रवेशद्वारापर्यंतच सीमित असणे अपेक्षित आहे आणि त्या वस्तूंची सदनिकेच्या आतील वाहतूक ही सदनिकेच्या संबंधित कर्मचार्याने करावी. वितरण कर्मचारी आणि सदनिकेतील व्यक्ती यांच्यात होणारी सर्व देवाणघेवाण ही नियम पाळून आणि कोविड च्या अनुषंगाने शिस्तबद्ध पद्धतीने होणे अपेक्षित आहे.

d. वितरण करताना वरील कोविडसंबंधित कुठल्याही नियमाचा भंग झाल्यास रु.1000/- इतका दंड भरावा लागेल. वारंवार निष्काळजीपणा आढळल्यास संबंधित संस्थेचा परवाना, हा कोविड-19 संबंधीची अधिसूचना असेपर्यंत रद्द केला जाऊ शकतो.

13. **सहकारी गृह निर्माण संस्था -**

a. कोणत्याही सहकारी गृह निर्माण संस्थेत एका वेळी पाच कोरोना विषाणू बाधीत रुग्ण आढळल्यास सदर सहकारी गृह निर्माण संस्था सुक्ष्म प्रतिबंधित क्षेत्र म्हणून घोषित केली जाईल. सुक्ष्म प्रतिबंधित क्षेत्रासाठी असलेल्या मानकांचे पालन करणे बंधनकारक राहील.

b. अशा गृह निर्माण संस्थांनी त्यांच्या संस्थेच्या प्रवेशद्वारावर "सुक्ष्म प्रतिबंधित क्षेत्र" म्हणून अभ्यागतांना प्रवेश बंदी असलेबाबतचा फलक लावणे बंधन कारक असेल. आणि अभ्यागतांना प्रवेशास मज्जाव करतील.

c. सोसायटीमध्ये तयार करणेत आलेल्या सुक्ष्म प्रतिबंधात्मक क्षेत्रामध्ये कोणत्याही नागरिकांचा प्रवेश व बाहेर जाणे याबाबत सोसायटीमार्फत नियंत्रण करणेत यावे.



Scanned with CamScanner

d. जर एखाद्या गृह निर्माण संस्थेने उक्त नमुद निर्देशांचा भंग केल्यास पहिल्या वेळेस रक्कम रुपये 10,000/- दंड करणेत येईल व दुसऱ्या वेळेस त्यापेक्षा जास्त दंड स्थानिक प्राधिकारी यांनी ठरविले प्रमाणे आकारणेत येईल. सदर आकारणेत आलेल्या दंडाच्या रक्कमेचा वापर हा सोसायटीमध्ये मार्गदर्शक सूचनांचे आणि या आदेशाचे पालन करणेसाठी नेमणेत आलेल्या कामगारांच्या पगारासाठी करणेत येईल.

e. सर्व सहकारी गृह निर्माण संस्थानी त्यांच्या संस्थेत वेळोवेळी येणाऱ्या व्यक्तींची ते जोपर्यंत लस घेत नाहीत तोपर्यंत **RTPCR / RAT /TruNAT / CBNAAT** चाचणी शासकीय निर्देशानुसार करुन घ्यावी.

**14. बांधकाम व्यवसाय -**

a. ज्या बांधकाम क्षेत्रात बांधकामाशी संबंधीत कर्मचारी / मजूर यांना बांधकामाच्या ठिकाणी राहणेची सोय आहे अशा बांधकाम व्यवसायास परवानगी असेल. अशा ठिकाणी साधन सामुग्री वाहतूकी व्यतिरिक्त कामगार व इतर वाहतूकीस परवानगी असणार नाही.

b. ज्या व्यक्ती अशा प्रकारच्या कार्यात सहभागी असतील त्यानी भारत सरकारच्या निर्देशानुसार तात्काळ लसीकरण करुन घ्यावे आणि संबंधित संस्थांनी सरकारी निकषानुसार कामाच्या ठिकाणी तात्काळ लसीकरणाची व्यवस्था करावी.

c. नियमांचे भंग करणाऱ्या बांधकाम व्यावसायिकांस रक्कम रुपये 10,000/- दंड आकारणेत येईल. तसेच पुन्हा पुन्हा नियमांचे उल्लंघन झालेस सदर बांधकामाचे ठिकाण हे कोव्हीड -19 संसर्ग अधिसूचना लागू असेपर्यंत बंद करणेत येईल.

d. जर एखादा कामगार तो किंवा ती कोरोना विषाणू बाधीत झाल्यास त्याला किंवा तिला वैदयकिय रजा देण्यात यावी व त्याला किंवा तिला कामावर गैरहजर राहीला या कारणास्तव कामावरुन कमी करता येणार नाही. सदर कामगारास पुर्ण पगारी वेतन देण्यात यावे.

e. बांधकामाच्या किंवा जनतेच्या सुरक्षेच्या दृष्टीकोनातुन पावसाळापुर्व खबरदारी म्हणुन स्थानिक प्राधिकरण एखादया बांधकाम कामास परवानगी देण्याबाबत निर्णय घेवु शकतात.

**15. दंडनिय कारवाई -**

जमा होणाऱ्या दंडाची रक्कम संबंधित स्थानिक आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाकडे देणेत येईल. सदर दंडाच्या रक्कमेचा वापर कोव्हीड-19 प्रतिबंधात्मक उपाययोजनांसाठी वापरणेत येईल.

सदर आदेशाची अंमलबजावणी दिनांक 14 एप्रिल 2021 चे रात्री 08.00 वाजलेपासून ते दिनांक 01 मे, 2021 चे सकाळी 07.00 वाजेपर्यंत लागू राहील. या आदेशामध्ये ज्या बाबींचा समावेश आला नसेल त्या बाबतीत यापुर्वीचे संदर्भ क्र. 4 व 5 मधील आदेशातील तरतुदी लागू राहतील.

सदर आदेशाची अंमलबजावणी करण्यास संबंधितांनी टाळाटाळ केल्यास अथवा विरोध दर्शविल्यास संबंधितांचे विरुध्द आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 चे कलम 51 ते 60, व भारतीय दंड संहिता (45 ऑफ 1860) कलम 188 नुसार तसेच भारतीय साथरोग अधिनियम 1897 अन्वये दंडनिय / कायदेशीर कारवाईस पात्र राहील.

जिल्हा दंडाधिकारी
सत्यमेव जयते
रत्नागिरी

(संजय शिंदे)
**जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,**
**रत्नागिरी**



Scanned with CamScanner